# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 21/12/2019 (शनिवार)
## (सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा दहेगाव येथे दिनांक 19/12/2019 चे 13.30 वा. ते दिनांक 20/12/2019 चे 19.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अभय भिमराव मडके, वय 34 वर्ष, रा. दहेगाव, वार्ड क्र. 5 या घराचे दाराला कुलूप लावुन परिवारासह जि. छिंदवाडा येथे पुण्यतिथीच्या कार्यक्रमाला गेल्या होत्या. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या घराचे दाराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने बेडरूम मधील लाकडी कपाट तोडून त्यामधील असलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 70,700/–रु. व नगदी 1,200/–रू. असा एकुण कि. 71,900/–रू. व चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिपक रेवतकर हे करीत आहे.

### विनयभंग

1) पो.स्टे. पारशिवनी :– दि. 20/12/2019 चे 18:00 वा. चे सुमारास आरोपी नामे– गौरव शंभरकर, रा. दिगलवाडी याच्या बहिनीला 18 वर्षीय पीडित/फिर्यादी हिचा कुत्रा चावला. दरम्यान फिर्यादी ही बहिनी सोबत घरी हजर असतांना फिर्यादीच्या घरात आरोपी हा अनाधिकृतपणे प्रवेश करून सामानाची फेकाफेक केली. तसेच आरोपीने पीडितेस मारहाण करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 354,452,323,504,506,34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नागरे हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– दि. 20/12/2019 चे 12:00 वा. ते 12:40 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 12 वर्षीय पीडित मुलगी हीचा पाठलाग आरोपी नामे– अमोल शिवचरन उईके, वय 30 वर्ष, रा. खुमारी याने करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), 354(ड) भादंवि. सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर